# 'आयसीडब्ल्यूए'च्या कार्यालयाचे स्थलांतर

औरंगाबाद, ता. ३० : औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटस्‌च्या (आय. सी. डब्ल्यू. ए.) कार्यालयाचे नुकतेच नवीन जागेत स्थलांतर झाले आहे. या नूतन जागेचे उद्‌घाटन 'आयसीडब्ल्यूए'चे उपाध्यक्ष के. एल. जयसिंग व धनंजय जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी एस. बी. खडके, एन. आर. शर्मा, एम. आर. पंडित, जी. आर. कुलकर्णी, श्री. गोरे, श्री. शुक्ला आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी स्थानिक शाखेचे अध्यक्ष रामानंद मोदानी यांनी सध्याच्या स्पर्धात्मक युगातील 'कॉस्ट अकाउंटिंग' तंत्रज्ञानाचे महत्त्व विषद केले. ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या चांगल्या संधी उपलब्ध असल्याचेही श्री. मोदानी यांनी सांगितले. या नूतन जागेत विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय; तसेच संगणक प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. 'आयसीडब्ल्यूए'च्या येथील शाखेच्या वतीने नेहमी विविध कालावधीच्या वर्गांचे आयोजन केले जाते. येत्या जानेवारीपासून विद्यार्थी व औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी 'सेंट्रल एक्साईज'चा कोर्स सुरू होत आहे. त्याचप्रमाणे आयसीडब्ल्यूए 'फाऊंडेशन' व 'इंटरमिजिएट'च्या वर्गांमध्ये प्रवेश नोंदणी सुरू झाली आहे, अशी माहिती ए. आर. जोशी यांनी या प्रसंगी दिली. अधिक माहितीसाठी अ-नऊ, चेतन सुपर मार्केट, त्रिमूर्ती चौक, जवाहर कॉलनी, दूरध्वनी-३२१८२८, येथे संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.